RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६९

दि. ०४ जुलै २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा-मुख्यमंत्री फडणवीस

### राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समिती बैठक




**मुंबई/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीस खासदार हेमंत सवरा यांच्यासह समितीमधील आमदार उपस्थित होते.

भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये अ‍ॅट्रॉसिटीचे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांमध्ये प्रकर्षाने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर प्रशिक्षण घेण्यात यावीत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सोलापूर, अहिल्यानगर, परभणी, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असण्यासंदर्भात पोलीस यंत्रणेने या मागील कारणे शोधावीत, याबाबत अधिक खोलवर चौकशी करून गुन्ह्यांचा शोध घेत अहवाल सादर करावा. कुठेही खोटे गुन्हे असल्यास तपासाअंती ते दाखल करण्यात येऊ नयेत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या सुनावणी दरम्यान खून, बलात्कार, दरोडे आदी गंभीर गुन्हे प्रकारातील साक्षीदारांचे संरक्षण करावे. त्यासाठी साक्षीदार संरक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

जिल्हास्तरावर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करीत सरकारी वकिलांशी संवाद व समन्वय वाढविण्यात यावा. या कायद्याच्या अंमलबजावणी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणांची कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून सहा महिन्याच्या अंतराने बैठक आयोजित करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीत सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सादरीकरण केले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, प्रधान सचिव (विधि व न्याय) दिलीप घुमरे, सचिव (आदिवासी विकास) विजय वाघमारे, अपर पोलिस महासंचालक (नागरी हक्क संरक्षण) अश्विती दोरजे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ आदी उपस्थित होते.

अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत देण्यात आलेली आर्थिक मदत व हेल्पलाईनविषयी माहिती

अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत २०२५-२६ मध्ये ४ हजार ५२४ पीडित व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात आली आहे. यापोटी ५३ कोटी ५७ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच २०२६-२७ मध्ये आतापर्यंत २ हजार ८१ पीडित व्यक्तींना २७ कोटी ४० लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत १४५६६ या हेल्पलाइनवरही तक्रारी स्वीकारण्यात येतात. या हेल्पलाइनवर प्राप्त २८२ तक्रारी १ जून २०२६ पूर्वी निकाली काढण्यात आल्या आहेत.

## रजिस्ट्री कार्यालय परिसरातील अतिक्रमणावर तहसील प्रशासन व मनपाची संयुक्त कारवाई; पुन्हा अतिक्रमण केल्यास गुन्हे दाखल करण्याचा इशारा







**लातूर/प्रतिनिधी:** लातूर येथील रजिस्ट्री कार्यालय क्रमांक १ व २ परिसरातील शासनाच्या जागेवरील अनेक वर्षांपासूनचे अतिक्रमण तहसील कार्यालय, लातूर व लातूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हटविण्यात आले. या कारवाईदरम्यान स्टॅम्प ड्युटी बॉण्ड रायटर यांनी शासनाच्या जागेवर केलेले अतिक्रमण तोडून हटविण्यात आले.

ही कारवाई तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच लातूर शहर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख समाधान सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत पार पडली. कारवाईदरम्यान शासनाच्या जागेवरील कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण सहन केले जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

यावेळी तहसीलदार सौदागर तांदळे यांनी कडक शब्दांत इशारा देत सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मालकीच्या शासनाच्या जागेवर पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतील. शासनाची जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी पुढेही अशा धडक कारवाया सुरू राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या संयुक्त कारवाईमुळे रजिस्ट्री कार्यालय परिसरातील अनेक वर्षांपासूनचे अतिक्रमण हटविण्यात यश आले असून परिसर मोकळा झाला आहे. प्रशासनाच्या या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

## डिजिटल पत्रकारिता कार्यशाळेचे ४ जुलै रोजी लातूरमध्ये आयोजन

**लातूर/प्रतिनिधी:** भारतीय पत्रकार संघ, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, दयानंद कला महाविद्यालय आणि आंबेडकराईट फिल्म मेकर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी डिजिटल पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



ही कार्यशाळा दयानंद कला महाविद्यालयातील डिजिटल क्लासरूममध्ये सकाळी ११ वाजता होणार असून, सहभागींसाठी सकाळी १०.३० वाजता नोंदणी अनिवार्य आहे.

या कार्यशाळेत सैराट, फँड्री, कासव, ट्रिपल सीट, अस्तू आणि नीलकंठ मास्तर यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांशी संबंधित कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. डिजिटल पत्रकारिता, सोशल मीडियाचा प्रभावी वापर, कॅमेरा अँगल्स, कॅमेऱ्याची विविध तांत्रिक वैशिष्ट्ये, दर्जेदार व्हिडिओ निर्मिती व सादरीकरण आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पत्रकारिता, डिजिटल मीडिया आणि कंटेंट क्रिएशन क्षेत्रात कार्यरत असलेल्या तसेच या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे सचिव दत्तात्रय जी. परळकर, संस्थापक अध्यक्ष रविकिरण सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष संजय राजुळे, कार्याध्यक्ष गंगाधर डिगोळे, शहराध्यक्ष अमोल घायाळ आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## सीआरपीएफचे वाहन उलटले; सहा जवान जखमी

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी झालेल्या अपघातात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) वाहनाला अपघात होऊन सहा जवान जखमी झाले. श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावरील सोनमर्ग (गगनगीर) बोगद्याजवळ हा अपघात घडला. प्राथमिक माहितीनुसार, वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ते रस्त्यावरून घसरून उलटले. अपघातात वाहनातील सहा सीआरपीएफ जवान जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि मदतकार्य सुरू करण्यात आले.

## सहाय्यक अभियंता शीलरत्न सूर्यवंशी यांचा सेवानिवृत्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न




**लातूर/प्रतिनिधी:** महावितरणच्या शहर शाखा क्र. १०, लातूर येथे सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत असलेले आयु. शीलरत्न बाबुराव सूर्यवंशी हे दि. ३० जून २०२६ रोजी प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने छत्रपती चौक, लातूर येथील हॉटेल वाडा येथे त्यांचा सेवानिवृत्ती सत्कार समारंभ अत्यंत आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमास मा. शिल्पाताई संजयजी बनसोडे, श्री अरविंदज बुलबुले (मुख्य अभियंता, परिमंडळ, लातूर), श्री अनिरुद्ध घाडगे (कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, लातूर), श्री शैलेश पाटील (अतिरिक्त कार्यकारी अभियंता तथा प्रादेशिक समन्वयक, सबऑर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशन), श्री रितेश साबळे (सहसचिव, सबऑर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशन, लातूर) यांच्यासह महावितरणचे अधिकारी, कर्मचारी, सूर्यवंशी साहेबांचे सहकारी, मित्रपरिवार, नातेवाईक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतात सूर्यवंशी साहेबांच्या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ आणि उत्कृष्ट सेवाकार्याचा गौरव करत त्यांना भावी आयुष्यासाठी निरोगी, आनंदी व यशस्वी जीवनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

उपस्थितांनीही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या पुढील आयुष्याला सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. स्नेह, आपुलकी आणि कृतज्ञतेच्या वातावरणात पार पडलेला हा सेवानिवृत्ती सत्कार समारंभ उपस्थितांच्या कायम स्मरणात राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आले .

## चेन्नईच्या भक्ताची शिर्डी साई बाबांना अनोखी भेट : अर्पण केला सुवर्ण शंख

**शिर्डी/प्रतिनिधी :** शिर्डीतील साई बाबांच्या चरणी चेन्नईच्या भक्तानं १०० ग्रॅम सोनाचा मुलामा असलेला शंख दान केला आहे. या शंखावर आकर्षक नक्षीकाम करण्यात आलेलं असून त्यावर सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे. या शंखाची किंमत १३ लाख २७ हजार ९०० रुपये इतकी आहे. जी लक्ष्मी कांता असं या चेन्नीईतील साईभक्ताचं नाव आहे. जी लक्ष्मी कांता यांनी गुरुवारी शिर्डीतील साई मंदिराला भेट देत हा शंख दान केला आहे, अशी माहिती शिर्डी साई मंदिराचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

हा शंख दान केल्याबद्दल साईभक्त जी लक्ष्मी कांता यांचा मंदिराच्या वतीनं सन्मान करण्यात आला आहे. साई बाबांवरील निस्सिम भक्तीमुळे दान केला सुवर्ण शंख : जी लक्ष्मी कांता यांनी सांगितलं की, ''साईबाबांवर गेल्या तीन दशकांपासून अखंड श्रद्धा आहे. सुमारे ३० वर्षापूर्वी माझ्या आयुष्यात अत्यंत कठीण काळ सुरू असताना मला साईबाबांचं बोलावणं आलं. तेव्हापासून मी दरवर्षी न चुकता शिर्डीत येऊन साईबाबांचं दर्शन घेते. साईबाबांवरील निस्सीम श्रद्धेपोटी मी दरवर्षी सलग १०८ दिवस पायात चप्पल न घालता कडक व्रत पाळते. साईबाबा प्रत्येक कठीण प्रसंगात आपल्याला मार्गदर्शन करतात. अगदी स्वप्नात येऊनही योग्य-अयोग्याची जाणीव करून देतात, असा माझा ठाम विश्वास आहे. साईबाबांच्या इच्छेशिवाय आपल्या आयुष्यात कोणताही महत्त्वाचा निर्णय मी घेत नाही. साईबाबांकडून मिळालेल्या कृपेनंच मी आनंदी राहून गरजू लोकांना मदत करू शकते. मी अर्पण केलेला सुवर्ण शंख हे केवळ मौल्यवान दान नसून साईबाबांप्रती असलेल्या अथांग भक्तीचं प्रतीक आहे, असं मी मानते.''

# रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना पहिल्याच बैठकीत आकराशे अर्जांना मंजूरी



**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार २ जुलै रोजी घेण्यात आली असून समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पहिल्याच बैठकीत तब्बल ११४६ अर्जांना मान्यता देण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत गठीत करण्यात आली आहे. दीड महिन्यापूर्वी गठीत झालेल्या या समितीस तातडीने बैठक घेऊन गोरगरीब, सर्वसामान्य गरजू लाभधारकांना, निराधारासह विधवा, अपंगांना लाभ द्यावा अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली होती. सदरील सूचनेनुसार २ जुलै रोजी रेणापूर तहसील कार्यालयात समिती अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत १३८४ अर्ज ठेवण्यात आले होते त्यापैकी ११४६ अर्जांना मंजुरी देण्यात आली तर उर्वरित त्रुटी असल्याने २३८ अर्ज नामंजूर करण्यात आले. प्रारंभी समिती सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात यांनी समिती अध्यक्षासह सर्व सदस्यांचा सत्कार करून स्वागत केले. तर समितीच्या वतीने सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्याचा सत्कार केला.

रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीस समितीचे अध्यक्ष सतीष रावसाहेब आंबेकर, सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात, सहा. गोविंद काळे, समिती सदस्य ललीता कांबळे, कस्तुराबाई माने, विठ्ठल कसपटे, संजय चव्हाण, गोविंदराव देशमुख, सदानंद पिंपळे, विरेन्द्रसिंह चौहान, सतिश जाधव, सुरेश बुड्डे यांच्यासह महसूल सहाय्यक गुलाब काळे, तुकाराम जाधव माहिती तंत्रज्ञान सहाय्यक विठ्ठल राठोडे आदी होते.

# क्युबेक सोबतच्या भागीदारीतून राज्यात मोठी गुंतवणूक होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## कॅनडातील क्युबेक प्रांतांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांसमवेत भेट

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र ही भारतामध्ये वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. देशात येणाऱ्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्के परकीय गुंतवणुक ही महाराष्ट्रात येते. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, क्वांटम कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, खाण संशोधन या क्षेत्रामध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी असून महाराष्ट्र क्युबेकसोबत या क्षेत्रासाठी भागीदारी करण्यास तयार आहे. या भागीदारीतून राज्यात निश्चितच मोठी गुंतवणूक येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

कॅनडातील क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळासमवेत झालेल्या चर्चे दरम्यान मुख्यमंत्री बोलत होते. याप्रसंगी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०१८ मध्ये मॉन्ट्रियल येथे भेट दिली असता, त्यावेळी माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीनीकरणीय ऊर्जा, जैवतंत्रज्ञान तसेच आदिवासी कल्याण या विषयावर सामंजस्य करार करण्यात आले होते. हे करार महाराष्ट्र आणि क्यूबेकमधील संबंध अधिक दृढ असल्याचे प्रतीक आहे. तसेच नुकतेच कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या नेतृत्वात आलेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाशी मुंबई भेटीदरम्यान महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी विषयी सकारात्मक चर्चा झाली होती.

नवी मुंबईमध्ये एज्युसिटी उभारण्यात येत असून या ठिकाणी सर्व आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे.या एज्युसिटीमध्ये क्यूबेकमधील विद्यापीठांनी आपली दालने उघडून 'मायनिंग इंजीनियरिंग' या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम विशेषत्वाने सुरू करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यामध्ये पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसह वाढवण बंदर प्रकल्पावर काम सुरू आहे. राज्यामध्ये गुंतवणूक करून उद्योग उभारण्यासाठी सुलभ धोरण आहे. राज्यातील गुंतवणूक ही दीर्घकालीन अनुकूल परिणाम देणारी आहे. 'क्रिटिकल आणि स्ट्रॅटेजिक मिनरल्स' मध्ये गुंतवणुकीची क्यूबेकमधील गुंतवणूकदारांना मोठी संधी आहे.

एरोस्पेस, डिफेन्स या क्षेत्रातही राज्यामध्ये मोठे काम होत आहे. नागपूर परिसरात 'डिफेन्स कॉरिडोर' ची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे एरोस्पेस क्षेत्राची परिसंस्था वेगाने विस्तारित होत आहे. त्याचप्रमाणे जीसीसी, डेटा सेंटर, बॅटरी स्टोरेज, कृषी मधील नवीन तंत्रज्ञान या क्षेत्रातही महाराष्ट्र पुढे येत आहे. त्यामुळे क्यूबेकने महाराष्ट्रसोबत दीर्घकालीन भागीदारी करावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले.

क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट म्हणाले की, क्यूबेक कॅनडामध्ये प्रगत राज्य असून कृत्रिम बुद्धिमत्ता, डाटा सेंटर, शिक्षण, क्रिटिकल मिनरल्स यामध्ये मोठी गुंतवणूक आहे. क्युबेक महाराष्ट्रासोबत विविध क्षेत्रांमध्ये भागीदारी करण्यास तयार आहे. पेन्शन फंड संस्थेच्या माध्यमातून भारतामध्ये मोठी गुंतवणूक करण्यास क्युबेकने तयारी केली आहे. भागीदारीच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यात रस असल्याचेही स्किट यांनी सांगितले.

यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबळगन, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे, कॅनडातील क्यूबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार सहाय्यक उपमंत्री डॉमिनिक मार्कोट्टे, सल्लागार श्रीमती लिया फर्टीन, संचालक मायकल कॉन्स्टेनिन, स्टीफन फलेक्कर, क्यूबेक प्रांतातील सीडीपीक्यू गुंतवणूक संस्थेचे भारतातील व्यवस्थापकीय संचालक नटराजन वेंकटरमण आदी उपस्थित होते.

# सबळ शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र !

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात व्यापक, तांत्रिकदृष्ट्या प्रगत अशी योजना आहे. थकीत कर्जाचा डोंगर उपसल्यामुळे ५६ लाख शेतकरी पुन्हा एकदा बँकिंग प्रवाहाशी जोडले जातील, ज्यामुळे त्यांना नवीन तंत्रज्ञान आणि बी-बियाणांसाठी पतपुरवठा उपलब्ध होईल. संपूर्ण कर्जमुक्ती, एकवेळ समझोता आणि नियमित परतफेड करणाऱ्यास प्रोत्साहनपर लाभांबाबत आपण यापूर्वीच्या लेखात समजून घेतलं. आज आपण या योजनेसाठी अपात्रताधारक कोण असतील, याबाबतही चर्चा करू.

ही योजना केवळ एक कर्जमाफीची वा कर्जमुक्तीची घोषणा नाही, तर तंत्रज्ञानाची अचूक जोड देऊन राबवली जाणारी एक ऐतिहासिक मोहीम आहे. या पारदर्शक पद्धतीमुळे मध्यस्थांचा सुळसुळाट थांबेल आणि आर्थिक मदत थेट शेतकऱ्याच्या खात्यात जमा होईल. आता गरज आहे ती फक्त एकाच गोष्टीची-शेतकऱ्यांनी जागरूक राहून आपले डिजिटल प्रमाणीकरण वेळेवर पूर्ण करण्याची ! तरच या ऐतिहासिक योजनेचा खरा उद्देश सफल होण्यास मदत होईल.

कर्जाच्या ओझ्याखाली ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेमुळे पुन्हा एकदा आत्मविश्वासाने शेती करण्यासाठी बळ मिळणार आहे. २ लाखांची मुदत, मधील लवचिकता आणि नियमित कर्जदारांना दिलेले प्रोत्साहन यांमुळे ही योजना मागील योजनांपेक्षा अधिक सर्वसमावेशक ठरणारी आहे.

पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणारच. पण या योजनेतील अपात्रताधारक कोण आहेत, याचीही माहिती असणे आवश्यक आहे. या योजनेत राजकीय, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सरकारी कर्मचारी, सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारी, शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर आयकर भरणारे व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक अपात्र ठरविण्यात आले आहेत. सहकारी साखर कारखान्यांचे हंगामी कामगार मात्र, या योजनेसाठी पात्र असतील.

आजी- माजी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, केंद्र व राज्य सरकारचे कर्मचारी, अधिकारी ज्यांचे मासिक वेतन ₹२५,००० पेक्षा जास्त आहे. महावितरण, महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ, राज्य परिवहन महामंडळ इ. मधील ₹२५,००० पेक्षा जास्त वेतन असलेले कर्मचारी, शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती., ज्यांचे मासिक पेन्शन ₹२५,००० पेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून)., कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., सहकारी दूध संघ या संस्थांचे पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ), अधिकारी व कर्मचारी ज्यांचे एकत्रित वेतन रूपये २५ हजार पेक्षा जास्त असणाऱ्या व्यक्ती योजनेसाठी अपात्र असतील.

केवळ शेतकऱ्यांना थकबाकी मुक्त करणे, हा या योजनेचा उद्देश नाही. शेतकऱ्याला पुन्हा आत्मविश्वासाने उभे करणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणे, हे मुख्य ध्येय आहे. सबळ शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र या मंत्राचा उच्चार करत, ही योजना राज्याच्या कृषी क्षेत्रासाठी खऱ्या अर्थाने एक मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही. (क्रमश:)

०००००००००००००००००००००

**डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# उघड्या मॅनहोल्समुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करा

**मुंबई/प्रतिनिधी :** पावसाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील उघडे किंवा नादुरुस्त मॅनहोल्स, साचलेले पाणी आणि त्यातून बालकांच्या जीवितास निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती व संबंधित स्थानिक प्रशासनाला तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, करण्यात आलेल्या कार्यवाहीचा ॲक्शन टेकन रिपोर्ट सात दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.अनेक ठिकाणी रस्त्यांवरील तसेच गृहनिर्माण संस्थांच्या परिसरातील मॅनहोल्स उघड्या किंवा तुटलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने साचलेल्या पाण्यामुळे उघडे मॅनहोल्स दिसून येत नसल्याने नागरिकांच्या, विशेषतः बालकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण होत आहे. यापूर्वी अशा घटनांमध्ये बालकांचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या आहेत.या पार्श्र्वभूमीवर आयोगाने स्थानिक प्रशासनाला पुढील उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यक्षेत्रातील सर्व मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, पदपथ तसेच शाळा व अंगणवाड्यांच्या परिसरातील उघड्या किंवा नादुरुस्त मॅनहोल्सचे तातडीने सर्वेक्षण करून ती मजबूत झाकणांनी बंद करावीत. ज्या ठिकाणी तात्काळ दुरुस्ती शक्य नसेल, तेथे बॅरिकेड्स उभारून रात्री स्पष्टपणे दिसतील असे धोक्याचे सूचना फलक लावावेत. सर्व गृहनिर्माण संस्था आणि व्यावसायिक संकुलांना त्यांच्या परिसरातील मॅनहोल्स सुरक्षित ठेवण्याबाबत कडक सूचना द्याव्यात.

पावसाळ्यात अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी २४ तास कार्यरत हेल्पलाईन आणि तात्काळ कृती पथक सज्ज ठेवावे. राज्यातील एकाही बालकाला प्रशासकीय निष्काळजीपणामुळे जीव गमवावा लागू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यंत गांभीर्याने कार्यवाही करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच, करण्यात आलेल्या उपाययोजनांचा सविस्तर ॲक्शन टेकन रिपोर्ट सात दिवसांच्या आत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत

# रोजगार हमीपलीकडे विकसित गावांच्या नव्या युगाची सुरुवात

## 'विकसित भारत - जी-राम-जी' कायदा ग्रामीण भारताच्या विकासाची व्याख्या बदलणार

दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण भारताच्या रोजगार सुरक्षेचा आधार ठरलेली मनरेगा योजना आता नव्या स्वरूपात पुढे आली आहे. 'विकसित भारत - जी-राम-जी' हा कायदा १ जुलै २०२६ पासून देशभर लागू झाला आहे. नुकताच २ जुलै रोजी या योजनेचा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते देशव्यापी शुभारंभ करण्यात आला. पहिल्या दृष्टीक्षेपात हा बदल केवळ १०० दिवसांच्या रोजगार हमीऐवजी १२५ दिवसांची हमी देणारा वाटू शकतो; परंतु प्रत्यक्षात या कायद्याचा गाभा रोजगारापेक्षा गावाच्या विकास नियोजनात आहे. ग्रामीण भारताच्या विकासाची दिशा, ग्रामपंचायतींची भूमिका आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची पद्धत बदलण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

या कायद्यातील सर्वांत मोठा बदल म्हणजे 'विकसित ग्रामपंचायत आराखडा'. आजपर्यंत अनेक गावांमध्ये विकासकामे उपलब्ध निधी किंवा विभागीय योजनांनुसार निश्र्चित केली जात होती. आता प्रत्येक गावाने स्वतःच्या गरजा ओळखून ग्रामसभेच्या माध्यमातून पुढील काही वर्षांसाठी विकास आराखडा तयार करायचा आहे. गावात पाण्याची टंचाई कोठे आहे, कोणत्या शेतकऱ्यांना सिंचनाची गरज आहे, कुठे शेततळी आवश्यक आहेत, कोणत्या वस्तीला रस्ता हवा, कुठे वृक्षलागवड करायची, पशुपालन, रेशीम




उद्योग, मत्स्यव्यवसाय, महिला बचत गट, युवकांचा कौशल्य विकास, तसेच हवामान बदलाशी सुसंगत कामे, या सर्व बाबींचा विचार एकाच आराखड्यात केला जाणार आहे. म्हणजेच आता ही केवळ 'काम शोधून देणारी योजना' न राहता 'विकास नियोजनावर आधारित रोजगार' ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे.

या कायद्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध विभागांच्या योजनांचा समन्वय. आतापर्यंत कृषी, जलसंधारण, ग्रामविकास, वन, पशुसंवर्धन, पंचायत राज, महिला व बालविकास आदी विभागांच्या योजना स्वतंत्रपणे राबवल्या जात होत्या. परिणामी, अनेकदा एकाच गावात विविध विभागांकडून कामे झाली; मात्र त्यांच्यात परस्पर सुसंगती नव्हती. आता 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' हा सर्व योजनांसाठी समान विकास आराखडा ठरणार आहे. त्यामुळे निधीचा अधिक परिणामकारक वापर होईल आणि निर्माण होणाऱ्या मालमत्ता दीर्घकाळ उपयुक्त ठरतील. हा बदल केवळ प्रशासकीय नसून विकासाच्या विचारपद्धतीतील मूलभूत परिवर्तन आहे.

ग्रामीण मजुरांच्या दृष्टीनेही हा कायदा महत्त्वाचा आहे. रोजगाराची कायदेशीर हमी १०० दिवसांवरून १२५ दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे. कामाची मागणी करूनही विहित मुदतीत रोजगार उपलब्ध झाला नाही, तर बेरोजगारी भत्त्याची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. मजुरी वेळेत देणे बंधनकारक करण्यात आले असून विलंब झाल्यास भरपाई देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. महाराष्ट्रासाठी चालू आर्थिक वर्षातील दैनंदिन मजुरी ३१७ रुपये निश्र्चित करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्न सुरक्षेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

या कायद्यामुळे ग्रामसभेचे महत्त्वही लक्षणीयरीत्या वाढणार आहे. कोणती कामे करायची, कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे आणि गावाचा विकास कोणत्या दिशेने करायचा, याचा निर्णय आता ग्रामसभेतील चर्चेतून होणार आहे. लोकसहभागाशिवाय 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' प्रभावी ठरू शकत नाही. त्यामुळे ग्रामसभा ही केवळ औपचारिक बैठक न राहता गावाच्या विकासाचे निर्णय घेणारे प्रभावी व्यासपीठ बनणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, भूमिहीन आणि इतर वंचित घटकांच्या गरजांचाही विकास आराखड्यात स्वतंत्रपणे विचार करण्यावर भर देण्यात आला आहे.

या कायद्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तंत्रज्ञानाचा व्यापक वापर. डिजिटल नोंदणी, ई-केवायसी, ऑनलाइन उपस्थिती, जीआयएस-आधारित नियोजन, पोर्टलवर कामांची माहिती, निधी वितरणाचे डिजिटल व्यवस्थापन आणि सामाजिक लेखापरीक्षण यांमुळे पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे केवळ कामांची नोंद ठेवली जाणार नाही, तर निर्माण झालेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष उपयोग, गुणवत्ता आणि परिणामकारकताही तपासता येईल. गावांचा विकास डेटा-आधारित पद्धतीने मोजण्याची संधी या प्रणालीमुळे उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्राच्या दृष्टीने या कायद्यात मोठी संधी दडलेली आहे. राज्यात जलसंधारण, शेततळी, सिंचन विहिरी, फळबागा, रेशीम उद्योग, पशुपालन, चारागाह विकास, गाव तलावांचे पुनरुज्जीवन, ग्रामीण रस्ते आणि हवामान बदलाशी सुसंगत शेती यांसारख्या कामांना चालना देता येईल. विशेषतः दुष्काळग्रस्त भागांत पाणलोट विकास, पश्र्चिम महाराष्ट्रात जलव्यवस्थापन आणि विदर्भ-मराठवाड्यात नैसर्गिक संसाधन संवर्धनासाठी या कायद्याचा प्रभावी वापर होऊ शकतो. रोजगार उपलब्ध करून देतानाच उत्पादनक्षम आणि शाश्र्वत मालमत्ता निर्माण करण्याची संधी हा या कायद्याचा सर्वांत मोठा लाभ ठरू शकतो.

'विकसित भारत' हे केवळ राष्ट्रीय घोषवाक्य नाही; त्याची सुरुवात प्रत्येक गावातून होणार आहे. त्यामुळे या कायद्याचे यश किती दिवस रोजगार मिळाला यावर नव्हे, तर प्रत्येक गावाने किती सक्षम विकास आराखडा तयार केला, किती शाश्र्वत मालमत्ता निर्माण केली, ग्रामसभेचा सहभाग किती वाढवला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था किती सक्षम केली, यावर मोजले जाईल. रोजगार हमी ही या कायद्याची सुरुवात आहे; परंतु विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर गावांची निर्मिती हेच त्याचे अंतिम ध्येय आहे.

सचिन अडसूळ
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

## संपादकीय...

### आस्थेच्या ठीकाणी चोरी, कडक शिक्षा हवी...

हिंदूंचे आस्थेचे अयोध्येतील भगवान राममंदिर आज जागतिक स्तरावर प्रसिद्ध मंदिर मानल्या जाते आणि अशा ठिकाणी देणगी चोरीचा प्रकार घडने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.या मंदिरात दररोज लाखो भाविक आपली हजेरी लावतात.कारण भगवान राम हे संपूर्ण भारतवर्षाचे आस्थेचे प्रतीक आहे.अशा महत्वपूर्ण मंदिरात प्रत्येक भक्तगण फुल नाही फुलांची पाकळी म्हणून देणगीच्या रूपात देत असतात.अशा प्रकारे राममंदिरात देणगीच्या रूपात दररोज सुमारे २० लाख रूपयांपेक्षा जास्त देणगी जमा होत असते, याव्यतिरिक्त सोने-चांदी सारखे आभुषण देणगीच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात येत असल्याचे सांगितले जाते आणि यात ट्रस्टच्याच लोकांनी चोरांची टोळी तयार करून घृणीत कार्य करून चोरीचे घोर पाप केले आहे.कारण देशातील प्रत्येक भाविकांनी आपल्या आस्थेचे प्रतीक म्हणून राममंदिरात देणगी अर्पण करीत असतो आणि येथीलच लोकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी देणगीच्या तिजोरीवर हात साफ केला हे घोर पाप कधीच धुतल्या जाणार नाही. कारण दानदाते गोरगरीब, सर्वसामान्य, शेतकरी,श्रीमंत अशा सर्वच स्तरातील भक्तांचा यात समावेश असतो आणि आहे.देणगी चोरीचा प्रकार अंदाजे २०० कोटी रूपयापर्यंत असल्याचे सांगितले जाते.परंतु देणगीच्या तिजोरीवर २०२० पासुनच चोरांची नजर असावी हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे हा आकडा २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त जावू शकतो.कारण यात सोने-चांदीचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे.देणगी चोरीमध्ये मोठमोठे दिग्गज सहभागी असु शकतात आणि आहेत त्यांची नावे समोर आणण्यास सरकार हिचकिचावत आहे यालाही नाकारता येत नाही. अयोध्येतील राम मंदिरात भाविकांकडून मिळालेल्या देणगीच्या अपहार प्रकरणात आठ जणांना अटक करण्यात आली आहे यात अविनाश शुक्ला,अनुकल्प मिश्रा,लवकुश मिश्रा,मनीष कुमार यादव,करूनेश पांडे, रामशंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव, रामशंकर यादव, उर्फ टिन्नु या आठ जनांना अटक करण्यात आली आहे व यांना २९ जून पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.परंतु याप्रकरणातील मोठे आरोपी आणि मास्टरमाइंड अजुनही मोकाट फिरत आहेत.यांना सरकार बेड्या का ठोकत नाही?अयोध्येतील राममंदिर देणगी घोटाळा मोठ्या प्रमाणात असल्याने आणि आपल्या अंगलट येत असल्याचे पाहून श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र विश्वस्त न्यासाचे सरचिटणीस चंपत राय आणि त्यांचे प्रभावशाली सदस्य डॉ.अनिल मिश्रा यांनी २६ जूनला आपल्या पदाचे राजीनामे दिले.याच्या पदाच्या राजीनाम्यामुळे स्पष्ट होते की देणगी चोरी प्रकरणात या दोघांचे हात अवश्य असुन मोठमोठे दिग्गज यात सहभागी असावे. माझ्या माहितीनुसार रामजन्मभूमी तिर्थक्षेत्र ट्रस्टच्या अध्यक्षांनी चौकशी होईपर्यंत कोणत्याही विश्वस्तांचे किंवा कर्मचाऱ्यांचे राजीनामे स्विकारू नये.कारण हिंदूंनी आपल्या घामाचा एक-एक पैसा दान पेटीत जमा केला आणि त्यावर ट्रस्टच्याच काही लोकांनी हात साफ केला.त्यामुळे संपूर्ण चौकशी होईपर्यंत आणि गुन्हेगारांना शिक्षा होईपर्यंत ट्रस्टचे सदस्य व कर्मचारी राज्याबाहेर किंवा देशाबाहेर जाणार नाही व राजीनामा देणार नाही याकडे केंद्र सरकारने व मुख्यत्वे करून रामजन्मभूमी तिर्थक्षेत्र ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्यगोपाल दास आणि कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी लक्ष दिले पाहिजे.श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची निर्मिती उत्तर प्रदेश सरकारने केलेली नाही.त्यामुळे यात उत्तर प्रदेश सरकारने हस्तक्षेप न करता ही चौकशी केंद्राच्या स्वाधीन करावी.सर्वोच्च न्यायालयाच्या अयोध्या निकालाच्या अनुषंगाने फेब्रुवारी २०२० मध्ये ट्रस्टची स्थापना करण्यात आली.त्यामुळे याप्रकरणात उत्तरप्रदेश सरकारने हस्तक्षेप करू नये. चौकशीची संपूर्ण जबाबदारी केंद्र सरकारची आहे.कारण या ट्रस्टची स्थापना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२० मध्ये केली.या ट्रस्टचे अध्यक्ष महंत नत्यागोपाल दास आहेत, कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज,सरचिटणीस (जनरल सेक्रेटरी) चंपत राय आणि त्यांचे प्रभावशाली सदस्य डॉ.अनिल मिश्रा आहेत.आणि इतर सदस्य अशाप्रकारे १५ विश्वस्तांची (ट्रस्टी)ही कमिटी आहे. त्यामुळे देणगी चोरी प्रकरणात ट्रस्टवर ताशेरे उठत आहेत. कारण २०२० पासून देणगी स्वरुपात येणारा पैसा, सोन्या- चांदीच्या वस्तू चोरी होत असावी असाही संशय भारतीयांच्या मनात निर्माण होतो आहे किंवा प्रश्न उपस्थित होतो.त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या मार्फत ट्रस्टच्या संपूर्ण सदस्यांची व त्यांच्या परिवाराची आणि कर्मचाऱ्यांची चौकशी करून राममंदिराचा पैसा व वस्तू मंदिरापर्यंत आल्या पाहिजेत याची जबाबदारी केंद्र सरकारने स्विकारावी कारण हा घोटाळा २०२६ मध्ये लक्षात आला आहे.परंतु हा घोटाळा २०२० पासून सूरू होता याही गोष्टीला नाकारता येत नाही.२०२० पासून जर हा घोटाळा सुरू असेल तर देणगी चोरीच्या आकड्यात आश्चर्य कारक भर पडून २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त सुद्धा जाऊ शकतो.कारण आस्थेच्या ठिकाणी झालेली चोरी साधुसंतांच्या प्रतिमेला मलीन करू शकते.त्यामुळे निश्पक्ष चौकशी करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.कारण मंदिराच्या उभारणीसाठी आलेल्या देणग्या आणि दानपेटीतील रकमेचे व्यवस्थापन व देखरेख या ट्रस्टद्वारे केली जाते.त्यामुळे चोरीचा ठीकरा ट्रस्टवर आहे व चोरीचे प्रथम गुन्हेगार ट्रस्ट आहेत त्यानंतर त्यांचे नातेवाईक व कर्मचारी.कारण ही देणगीची चोरी आहे त्यामुळे हे मोठे रॅकेट राहु शकते.रामजन्मभुमी ट्रस्टवर सरकारी नियंत्रण पुर्वीपासून रहाले असते तर चोरी प्रकार टळला असता.परंतु देणगी चोरीच्या प्रकरणात ट्रस्टच्या विश्वस्तांनी व तेथील कर्मचाऱ्यांनी साठगाठ करून दाणाचा पैसा आभूषणे लुटल्याचे स्पष्ट होते.त्यामुळे याप्रकरणातील एकही चोर सुटणार नाही याची खबरदारी राज्य व केंद्र सरकारने घ्यावी व यात कोणत्याही प्रकारचे राजकारण होणार नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे.त्याचप्रमाणे गुन्हेगारांच्या संपत्तीवर ताबडतोब बुलडोझर चालवून त्यांना कठोर शिक्षा द्यायला हवी.जय श्रीराम!

# घोडबंदर मार्गावर विचित्र अपघात, संरक्षण कठडा तोडून ट्रक उड्डाण पुलावर लटकला, मोठी दुर्घटना टळली

**ठाणे/प्रतिनिधी :** घोडबंदर मार्गावरील कासारवडवली उड्डाणपुलावर शुक्रवारी पहाटे एक धक्कादायक अपघात घडला. १२ टन वजनाचे गूळ वाहून नेणाऱ्या ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रकने उड्डाणपुलावरील संरक्षण कठडा तोडला आणि तो अक्षरश: उड्डाणपुलाच्या कडेला लटकून राहिला. सुदैवाने ट्रक खाली कोसळला नाही. अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती.

या अपघातामुळे घोडबंदर मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली. घोडबंदर मार्ग हा ठाणे आणि गुजरातला जोडणारा अत्यंत वर्दळीचा मार्ग असून, या मार्गावर दररोज हजारो जड व अवजड वाहनांसह मोठ्या प्रमाणात खासगी आणि सार्वजनिक वाहतूक सुरू असते. परिसरातील वाढती लोकवस्ती आणि वाहनांची संख्या लक्षात घेता या मार्गावर नेहमीच मोठी वर्दळ असते. पुण्याहून डहाणूकडे १२ टन गूळ घेऊन जाणारा ट्रक शुक्रवारी पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास कासारवडवली उड्डाणपुलावर पोहोचला. यावेळी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक थेट उड्डाणपुलाच्या संरक्षण कठड्यावर आदळला. धडकेचा जोर इतका होता की कठड्याचा काही भाग तुटून ट्रकचा पुढील भाग उड्डाणपुलाच्या बाहेर लटकला. ट्रक अर्धवट अवस्थेत अडकून राहिल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. या उड्डाणपुलाखाली सध्या रस्ते रुंदीकरणाचे काम सुरू आहे. मात्र ट्रक पुलावरच अडकून राहिल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, वाहतूक पोलीस आणि महापालिकेच्या यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. ट्रक सुरक्षितपणे हटविण्यासाठी क्रेनच्या सहाय्याने प्रयत्न सुरू करण्यात आले. मात्र ट्रकची स्थिती धोकादायक असल्याने तो तातडीने हटविणे शक्य झाले नाही. सकाळी साडेदहा वाजेपर्यंतही ट्रक रस्त्यावरून हटविण्यात यश आले नव्हते. त्यामुळे घोडबंदर मार्गावर दोन्ही दिशांना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

अपघातग्रस्त वाहन ११ वाजताच्या सुमारास रस्त्यामधून बाजूला करण्यात आले.

# शाळेच्या बसमधून घरी पोहोचेपर्यंत मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शाळेचीच: उच्च न्यायालय

बंगळुरू : शाळेच्या आवारात बसमध्ये चढल्यापासून ते पालकांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचेपर्यंत मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची असते, असे कर्नाटक उच्च न्यायालयाने स्पष्ट केलंय. शाळेच्या बसमधील अपघातात एका विद्यार्थ्याचा डोळा निकामी झाल्याच्या घटनेबाबत एका खासगी शाळेच्या व्यवस्थापनावर दाखल केलेला खटला रद्द करण्यास न्यायालयाने नकार दिला. न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने मंड्या जिल्ह्यातील मद्दूर येथील एका खासगी शाळेच्या व्यवस्थापन मंडळाने दाखल केलेल्या फौजदारी याचिकेवर सुनावणी केली. शाळेच्या बसमधील अपघातात इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्याचा डोळा निकामी झाल्याच्या घटनेवरून दाखल झालेला खटला रद्द करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

शाळेच्या बसमधील मुलांची सुरक्षा ही केवळ सौजन्याची किंवा सोयीची बाब नाही; तर 'कर्नाटक शैक्षणिक संस्था नियम, २०१८' अंतर्गत पाळणे बंधनकारक असलेली ती एक कायदेशीर जबाबदारी आहे. एकदा का मूल शाळेच्या बसमध्ये चढले की, ते अंतिम थांब्यावर (स्टॉपवर) पोहोचेपर्यंत शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी कायम राहते. त्यामुळे घटनेच्या वेळी बसमध्ये मदतनीस (अटेंडंट) होता का? सीसीटीव्ही केवळ 'शोभेसाठी' होते की कार्यरत होते? मुले प्रतिबंधित किंवा धोकादायक वस्तू बसमध्ये कशा आणू शकली? या प्रश्नांची उत्तरे तपासाद्वारे मिळणे आवश्यक आहे. शिवाय, एका लहान आणि वाढत्या वयातील मुलाला आता आयुष्यभर दृष्टिदोष किंवा एका डोळ्याच्या व्यंगाचे ओझे वाहावे लागणार आहे. अशा गंभीर परिस्थितीत प्राथमिक टप्प्यावरच तपास प्रक्रिया रद्द केली जाऊ शकत नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. खंडपीठाने याचिका फेटाळून लावली आणि व्यवस्थापन मंडळ निष्काळजी होते की नाही, हे पूर्ण तपासानंतरच निश्चित केले जावे, असे आदेश दिले.प्रकरण काय होते? : १ ऑगस्ट २०२५ रोजी शाळेच्या बसमध्ये इतर विद्यार्थ्यांनी आणलेल्या वस्तू जसे की रंगीत कागद आणि फटाके यांच्या स्फोटामुळे इयत्ता चौथीच्या एका विद्यार्थ्याचा डोळा निकामी झाला. उपचारानंतर डॉक्टरांनी ४० टक्के अपंगत्व असल्याचे निश्चित केले. शाळेच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप करत मुलाच्या पालकांनी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला. शाळा व्यवस्थापन मंडळाने उच्च न्यायालयात याला आव्हान दिले. सुनावणीदरम्यान, याचिकाकर्त्या शाळेच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, ही घटना शाळेची वेळ संपल्यानंतर बसमधील दुसऱ्या मुलाकडून अनवधानाने घडली होती; त्यामुळे शाळा प्रशासनाला जबाबदार धरण्यास कोणताही आधार नव्हता. शिवाय त्यांनी असा युक्तिवाद केला की, शालेय बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा आणि मदतनीस (अटेंडंट) तैनात करण्यात आले होते आणि म्हणून संबंधित एफआयआर रद्द करण्यात यावा. सरकारी वकिलांनी याला आक्षेप घेतला; त्यांनी सांगितले की, घटनेच्या वेळी बसमधील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत नव्हते आणि तिथे कोणताही मदतनीस देखील उपस्थित नव्हता. त्यामुळे हा अर्ज फेटाळला जाऊ नये.

# प्रा.डॉ.तबस्सुम मुजावर यांना भारत सरकारकडून पेटंट मंजूर

## पोलिअनिलीन आणि ग्राफीन ऑक्साईड वापरून मातीतील आर्द्रता मोजणारे साहित्य तयार

**लातूर/प्रतिनिधी :** भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीसाठी पाण्याचे योग्य व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक वेळा शेतकरी मातीतील ओलावा अचूक मोजू शकत नसल्यामुळे अंदाजाने सिंचन करतात.त्यामुळे कधी पिकांना आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी दिले जाते, तर कधी कमी पाणी मिळते.यामुळे पाण्याचा अपव्यय, उत्पादनात घट, जमिनीची सुपीकता कमी होणे आणि शेतीचा खर्च वाढणे अशा अनेक समस्या निर्माण होतात.या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून पोलिअनिलीन आणि ग्राफीन ऑक्साईड वापरून मातीतील आर्द्रता मोजणारे साहित्य या संशोधनामध्ये मातीतील आर्द्रता अचूकपणे मोजणारा एक अत्याधुनिक सेन्सर विकसित करण्यात आला आहे.तसेच या संशोधनात पोलिअनिलीन आणि ग्राफिन ऑक्साईड या दोन प्रगत पदार्थांचा वापर करण्यात आला आहे.पोलिअनिलीन हा एक विद्युत वाहक पॉलिमर असून तो कमी खर्चिक, रासायनिकदृष्ट्या स्थिर आणि उत्कृष्ट विद्युत चालकता असलेला पदार्थ आहे. त्यामुळे सेन्सर तयार करण्यासाठी तो अत्यंत उपयुक्त मानला जातो.दुसरीकडे ग्राफिन ऑक्साईड हा ग्राफीनपासून तयार होणारा नॅनोमटेरियल आहे. त्याचे पृष्ठभाग क्षेत्र खूप मोठे असल्याने तो पाण्याच्या रेणूंना अतिशय जलद प्रतिसाद देतो. तसेच तो हलका, मजबूत आणि अत्यंत संवेदनशील असल्यामुळे सेन्सरची कार्यक्षमता वाढते.या दोन्ही पदार्थांचे संयोग करून एक नवीन प्रकारचे संवेदनशील साहित्य विकसित करण्यात आले आहे.पोलिअनिलीनमुळे सेन्सरची विद्युत चालकता वाढते, तर ग्राफिन ऑक्साईडमुळे मातीतील आर्द्रतेतील अगदी लहान बदलही अचूकपणे ओळखता येतात.परिणामी तयार झालेला सेन्सर अधिक संवेदनशील,जलद प्रतिसाद देणारा, कमी खर्चिक आणि दीर्घकाळ टिकणारा बनतो.हा सेंसर मातीमध्ये बसविला जातो. मातीतील पाण्याचे प्रमाण बदलल्यावर सेन्सरचा विद्युत प्रतिकार किंवा विद्युत चालकता बदलते.माती कोरडी असताना प्रतिकार जास्त असतो, तर माती ओली झाल्यावर प्रतिकार कमी होतो.या बदलांचे मापन इलेक्ट्रॉनिक सर्किटद्वारे केले जाते. त्यानंतर मायक्रोकंट्रोलर आणि आय ओ टी प्रणालीच्या मदतीने ही माहिती मोबाईल किंवा संगणकावर पाठविली जाऊ शकते. त्यामुळे शेतकरी कोणत्याही ठिकाणाहून आपल्या शेतातील मातीतील ओलाव्याची माहिती मिळवू शकतो आणि आवश्यकतेनुसारच सिंचन करू शकतो.या संशोधनात सेन्सर तयार करण्यासाठी प्रथम ग्राफिन ऑक्साईड आणि पोलिअनिलीन तयार केले जातात. त्यानंतर योग्य प्रमाणात दोन्ही पदार्थ एकत्र करून संयुक्त मिश्र तयार केले जाते.या साहित्यापासून सेन्सर विकसित करून त्याची विविध प्रकारच्या मातीमध्ये आणि वेगवेगळ्या आर्द्रतेच्या परिस्थितीत चाचणी केली जाते.या प्रक्रियेमुळे सेन्सरची अचूकता, संवेदनशीलता आणि कार्यक्षमता निश्चित केली जाते.या संशोधनाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. या तंत्रज्ञानामुळे स्मार्ट शेती, स्वयंचलित सिंचन प्रणाली, हरितगृह शेती, जलसंधारण आणि पाण्याचे प्रभावी व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रांना मोठी चालना मिळू शकते. या सेन्सरचा वापर केल्यास पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल, विजेचा वापर कमी होईल, शेतीचा खर्च घटेल आणि पिकांचे उत्पादन वाढण्यास मदत होईल. तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत आणि आधुनिक शेतीसाठी हे तंत्रज्ञान अत्यंत



उपयुक्त ठरणार आहे, असे दयानंद विज्ञान महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ.तबस्सुम मुजावर यांनी म्हटले आहे.

या अभिनव संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट क्रमांक ५९३८४८ प्रदान करण्यात आला आहे. या संशोधनाचे शीर्षक ''पोलिअनिलीन आणि ग्राफीन ऑक्साईड वापरून मातीतील आर्द्रता मोजणारे साहित्य'' असे असून संशोधक डॉ. तबस्सुम हनीफ मुजावर,डॉ. विकास बाबुराव पाटील, श्रीमती शिवानी श्रीहरी गावंडे, श्री. अविनाश चंद्रकांत मोलाने आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर यांनी हे संशोधन विकसित केले आहे. हे संशोधन केवळ एक नवीन सेन्सर विकसित करण्यापुरते मर्यादित नसून, भविष्यातील स्मार्ट, डिजिटल आणि शाश्वत शेतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या तंत्रज्ञानामुळे भारतीय शेती अधिक आधुनिक, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक बनण्यास निश्चितच मदत होईल.

सदरील पेटेंट मिळाल्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.विश्वनाथ मोटे, डॉ.महादेव पंडगे, डॉ.श्वेता लोखंडे, डॉ.शंकर बिराजदार,प्रा.मेघा आञाम, डॉ.मंगेश आवाळे यांच्यासह इतर प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# हिमाचलमध्ये पावसाचा कहर; किन्नौरमध्ये राष्ट्रीय महामार्ग-५ बंद

शिमला : हिमाचल प्रदेशात मान्सूनने जोरदार हजेरी लावताच विविध भागांत नैसर्गिक आपत्तींचे संकट गडद झाले आहे. जनजातीय जिल्हा किन्नौरमध्ये चोलिंग परिसरात झालेल्या मुसळधार पावसानंतर अचानक आलेल्या पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. पुराच्या पाण्यासोबत आलेल्या माती, दगड आणि चिखलामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५ पूर्णपणे वाहतुकीसाठी बंद झाला असून अनेक वाहने रस्त्यात अडकली आहेत.

पुराचा वेग इतका प्रचंड होता की महामार्गावरून जाणारी अनेक वाहने चिखल आणि ढिगाऱ्यात अडकून पडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्वजण सुरक्षित आहेत.घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने बचाव आणि मार्ग मोकळा करण्याचे काम सुरू केले. किन्नौरचे उपायुक्त डॉ. अमित कुमार शर्मा यांनी घटनेची पुष्टी करत महामार्गावरील मलबा हटवण्यासाठी आणि अडकलेली वाहने बाहेर काढण्यासाठी जड यंत्रसामग्री तैनात करण्यात आल्याचे सांगितले. प्रशासनाचे पथक घटनास्थळी कार्यरत असून राष्ट्रीय महामार्ग लवकरात लवकर पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.दरम्यान, लाहौल-स्पीती जिल्ह्यातील जाहलमा नाल्यात आलेल्या पुरामुळे पूल पुन्हा एकदा बाधित झाला आहे. सीमारेषा रस्ते संघटनेने उभारलेली तात्पुरती पुलियाही पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने उदयपूर उपविभागासह पांगी खोऱ्याचा संपर्क तुटला आहे.

# ७ व ८ जुलै रोजी बीड जिल्ह्यातील अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळा बंद; हजारो शिक्षक मुंबई आंदोलनात सहभागी होणार!



**बीड/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षक समन्वय संघाच्या राज्यव्यापी आंदोलनाला पाठिंबा देत दिनांक ७ व दिनांक ८ जुलै रोजी बीड जिल्ह्यातील सर्व अंशतः अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा बंद ठेवण्यात येणार आहेत. याबाबत बीड जिल्हा शिक्षक समन्वय संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील यांना निवेदन देण्यात आले. तसेच यावेळी जिल्ह्यातील हजारो शिक्षक हे मुंबई येथील आझाद मैदानावर सुरू असलेल्या धरणे आंदोलनात सहभागी होणार असल्याचे ही कळविण्यात आले.

राज्यातील अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २२ जूनपासून आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. मात्र, शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने शिक्षक समन्वय संघाने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून ७ व ८ जुलै रोजी राज्यभरातील शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. या बंद मध्ये राज्यातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थाचालक, मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी सहभागी होऊन शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांना बळ द्यावे, असे आवाहन खंडेराव जगदाळे यांनी केले. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व अंशतः अनुदानित विनाअनुदानित शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी दोन दिवस ७ व ८ जुलै रोजी शाळा बंद ठेवून आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. यानुसार जिल्हा समन्वय संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांना निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे.

या निवेदनावर श्री. जितेंद्र डोंगरे, श्री. तुकाराम शिंदे, श्री. प्रताप पवार, श्रीमती मुक्ता मोटे मॅडम, श्री. आत्माराम वाव्हळ, श्री. अरविंद सौंदलकर, श्रीमती माने मॅडम, श्रीमती कांडेकर मॅडम, श्री. शेख, श्री. अशोक मोरे, श्री. महादेव शेंडगे, श्री. सुतार, श्री.भागवत यादव आदी पदाधिकारी व शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या असून, जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिक्षक मुंबईतील आंदोलनात सहभागी होणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ४ जुलै, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १८ जुलै, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# सी.आय.एस.एफ. मध्ये पॅरा मेडिकल स्टाफची भरती; लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलामध्ये पॅरा मेडिकल स्टाफ या तात्पुरत्या पदांच्या भरतीसाठी पात्र पुरुष आणि महिला भारतीय नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. या भरती प्रक्रियेत ए.एस.आय. (औषध विक्रेता) ची १८ पदे, ए.एस.आय. (एक्स-रे टेक्निशियन) चे १ पद आणि ए.एस. आय. (लॅब टेक्निशियन) च्या ५ पदांसह एकूण २४ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. या एकूण २४ पदांपैकी खुल्या प्रवर्गासाठी १५, ई.डब्लू.एस. साठी १, ओ.बी.सी. साठी ५, एस.सी. साठी २ आणि एस.टी. प्रवर्गासाठी १ पद राखीव असून, औषध विक्रेता पदांमध्ये २ जागा माजी सैनिकांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

ही भरती सर्व पुरुष व महिला उमेदवारांसाठी खुली असून पात्र उमेदवारांना केवळ एकाच पदासाठी अर्ज करता येईल. लातूर जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक आणि माजी सैनिक विधवांच्या पाल्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज ७ जुलै २०२६ रोजी रात्री २३:५९ वाजेपर्यंत सी.आय. एस.एफ. च्या https://cisfrectt.cisf.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे, कारण ऑनलाईन पद्धतीशिवाय इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

# हाफकिनचे खासगीकरण होणार नाही!

## मंत्री नरहरी झिरवाळ यांची विधानसभेत ग्वाही

**मुंबई/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली 'हाफकिन' संस्था कोणत्याही परिस्थितीत खासगीकरणाच्या मार्गावर नेली जाणार नाही. तसेच संस्थेच्या बळकटीकरणासाठी आणि सद्यस्थितीतील अडीअडचणींवर तोडगा काढण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित अधिकारी व आमदारांची एक विशेष बैठक बोलावण्यात येईल,'' अशी ग्वाही अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.



प्रश्नोत्तराच्या तासात काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी हाफकिनच्या खासगीकरणाच्या हालचालींवरून सरकारला प्रश्न विचारले होते. यावर उत्तर देताना सरकारने विरोधकांचे आरोप फेटाळत या संस्थेचे शासकीय अस्तित्व कायम राखण्याचे आश्वासन दिले. वडेट्टीवार म्हणाले, ''हाफकिन संस्थेच्या खासगीकरणाचा विषय यापूर्वीही चर्चेत आला होता. सुरुवातीला सरकारने या संस्थेची एक इंचही जमीन कोणाला दिली नसल्याचा दावा केला होता. मात्र, त्यानंतर टाटा समूहाला संशोधन केंद्रासाठी पाच एकर जमीन कराराद्वारे दिल्याचे स्पष्ट झाले. सरकारच्या या दाव्यांमध्ये आणि प्रत्यक्ष कृतीत मोठी विसंगती असून, या संपूर्ण व्यवहारात पारदर्शकता असणे अत्यंत आवश्यक आहे.'' हाफकिनला अत्यंत आवश्यक असलेल्या 'त्रिवेणी लस' निर्मितीसाठी आणि अद्ययावत यंत्रसामग्रीसाठी सुमारे १५० कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. जर अवघ्या १५० कोटी रुपयांच्या मर्यादित गुंतवणुकीमुळे ही ऐतिहासिक संस्था स्वत:च्या पायावर सक्षम उभी राहू शकत असेल, तर मग सरकारच्या मालकीच्या तब्बल १ हजार ५०० कोटी रुपयांच्या मौल्यवान मालमत्तेवर आणि जमिनीवर खासगी कंपन्यांची नजर का आहे? यात कोणाचे खासगी हितसंबंध गुंतले आहेत?'' असा सवाल करत सरकारने याबाबतची आपली अधिकृत भूमिका सभागृहात जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी लावून धरली.

विरोधकांचा वाढता आक्षेप आणि हाफकिनच्या जमिनीवरून उपस्थित झालेल्या प्रश्नांची दखल घेत मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, ''हाफकिन ही राज्याची स्वायत्त आणि महत्त्वाची संस्था असून तिचे खासगीकरण करण्याचा कोणताही विचार सरकारचा नाही. वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेले मुद्दे आणि संस्थेच्या सक्षमीकरणासाठी लागणारा निधी यावर मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक घेतली जाईल,'' असे सांगत मंत्र्यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

## श्रीमती वैजयंती निलेगांवकर यांचे यांचे निधन



**लातूर/प्रतिनिधी :** श्रीमती वैजयंती देविदासराव निलेगांवकर यांचे दि. ३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास वृध्दपकाळाने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवदेहावर दि. ४ जुलै रोजी सकाळी १० वाजता मारवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

## पीएम यशस्वी योजना: लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** पीएम यशस्वी अंतर्गत टॉप क्लास एज्युकेशन इन स्कूल फॉर ओबीसी, ईबीसी अँड डीएनटी स्टुडंट्स या योजनेची शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये लातूर जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर आपले अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत देण्यात आली आहे. या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील नामांकित (टॉप क्लास) शाळा किंवा कॉलेजमध्ये इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी मध्ये शिकणारे आणि इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या मागासलेले तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकूण वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, असे सर्व विद्यार्थी पात्र ठरणार आहेत. या कल्याणकारी योजनेच्या अंमलबजावणीबाबत जिल्ह्यातील सर्व संबंधित शाळा आणि महाविद्यालयांनी तात्काळ पुढाकार घेऊन आपल्या संस्थेतील १०० टक्के पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत नॅशनल पोर्टलवर भरून घ्यावेत, एकही पात्र विद्यार्थी या शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय प्र. अटकळ यांनी केले आहे.

## स्टँड अप इंडिया मार्जिन मनी योजना अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांनी ३१ जुलै पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील घटकांसाठी मार्जिन मनी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील इच्छूक नवउद्योजक लाभार्थ्यांनी आपले प्रस्ताव ३१ जुलै २०२६ पूर्वी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे. या योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना ९ मार्च २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आल्या असून, हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. या योजनेचा लाभ घेण्यास इच्छूक असणाऱ्या नवउद्योजकांनी या शासन निर्णयातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करून, आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत समाज कल्याण कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. अंतिम मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याने पात्र लाभार्थ्यांनी तात्काळ आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्यपाल जिष्णू देव वर्मा व कृषी मंत्री भरणे यांच्या हस्ते गणेश जगताप यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्यावतीने कृषी व कृषी क्षेत्रातील संबंधीत फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यामध्ये रेणापूर तालुक्यातील वाला येथील गणेश भगवानराव जगताप यांना महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा व राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या शुभहस्ते व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या उपस्थितीत वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार देऊन मुंबई येथील कार्यक्रमात सन्मानीत करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले, महाराष्ट्र राज्याचे कृषी राज्यमंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल, राज्याचे मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सुरज पांढरे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल गाव व परिसरातून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## उद्धव ठाकरेंकडून राम मंदिर आंदोलनाची घोषणा; म्हणाले, अब हिंदू माफ नहीं करेगा!

**मुंबई/प्रतिनिधी :** अयोध्येतील राम मंदिरात रामभक्तांनी दिलेल्या देणगीचा अपहार झाला असून याप्रकरणी एसआयटी चौकशी सुरू आहे. यावरून देशभरातील रामभक्तांनी संताप व्यक्त केला आहे. आता राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. राज्यातील रामभक्तांनी रविवारी, ५ जुलै रोजी दादर येथील कबुतरखाना येथे असलेल्या मारुती मंदिराजवळ आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. आज त्यांनी पत्रकार परिषद घेऊन यासंदर्भातील माहिती दिली.

संपूर्ण देशात गोंधळ, सर्वासामान्यांबद्दल अनास्था ओढावली आहे. कोणाला कोणाचं उत्तरदायित्वच राहिलेलं नाही. याच्या मुळावर आघात करण्याची वेळ आली आहे. संपूर्ण देश हा आज भाजपाच्या अंमलाखाली आहे. राम मंदिर हे भाजपाच्या सत्तेचं मूळ आहे ज्यात आम्हीही सहभागी होतो. राम मंदिरासाठी जे आंदोलन झालं होतं, त्यात अनेक शिवसैनिक होते. देशातील तमाम हिंदू सहभागी होता. तो काळही आठवत असेल. आपल्या माध्यमातून हे सारं दृष्य जनतेच्या मनात खोलवर रुजलेले आहे.

# मनपा आयुक्त पोचले कचरा डेपोवर!; मनपा शाळेलाही दिली भेट







**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी शुक्रवारी ( दि. ३) वरवंटी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली.मनपा शाळेलाही त्यांनी भेट दिली.

राहुल कुलकर्णी यांनी गुरुवारी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे. दुसऱ्याच दिवशी त्यांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन माहिती घेतली. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून तयार केलेले कंपोस्ट खत तसेच सुका कचरा प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प व जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांचीही त्यांनी माहिती घेतली.

यावेळी कचरा व्यवस्थापन व प्रक्रिया करण्यासाठी पूर्णपणे विलगीकृत कचरा येणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. या प्रक्रियेत काम करत असताना कर्मचाऱ्यांनी पूर्णपणे किटचा वापर करावा, असा आदेशही त्यांनी दिला. याप्रसंगी मनपा उपायुक्त वसुधा फड,कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रमुख धोंडीबा सोनवणे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

आयुक्तांनी शहरात मनपाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले मनपा शाळा क्र.९ ला भेटी दिली.तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मनपा शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना संदर्भात त्यांनी चर्चा केली.

आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यानंतर लागलीच विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाची माहिती घेत आहेत.

## खरीप हंगामात अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी राज्यातंर्गत पीक स्पर्धेकरिता अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देवून गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यातंर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

कृषी विभागामार्फत खरीप हंगामन सन २०२६ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफुल या पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. खरीप पीक स्पर्धे साठी अर्ज दाखल करण्याची मूग व उडीद पिकांसाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ व भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफुल या पिकासाठी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र असून सर्वसाधारण गटासाठी ३०० रुपये व आदिवासी गटासाठी १५० रुपये राहील. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वत:च्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी स्पर्धकास स्वत:च्या शेतावर भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर व इतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

पीक स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित करण्यात येणार असून सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुका स्तरावरील पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेवून शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरुन राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे विहीत नमुन्यातील अर्ज (प्रपत्र -अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, सातबारा, आठ अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), संबंधित सातबारावरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते धनादेश, पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. पिकस्पर्धा बक्षिसाचे स्वरुप सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी तालुका पातळी पहिले बक्षिस रुपये ५ हजार रुपये, दुसरे बक्षीस ३ हजार रुपये, तिसरे बक्षीस २ हजार रुपये, जिल्हा पातळी पहिले बक्षीस १० हजार रुपये, दुसरे बक्षीस ७ हजार रुपये, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये आणि राज्य पातळीवर पहिले बक्षीस ५० हजार रुपये, दुसरे बक्षीस ४० हजार रुपये, तिसरे बक्षीस ३० हजार रुपये राहील. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला किंवा संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

## अटल बोगद्यात भारतीय सैन्याची कामगिरी! 10 जवानांनी दोन म टारसायकलींवर बसून रचला इतिहास

कुल्लू ; हिमाचल प्रदेशातील प्रसिद्ध अटल बोगद्यात पुन्हा एकदा एका ऐतिहासिक कामगिरीची नोंद झालीय. भारतीय सैन्याच्या 'कॉर्प्स ऑफ सिग्नल्स'च्या 'डेअरडेव्हिल्स' पथकाने येथे एक धाडसी प्रात्यक्षिक सादर केले, ज्याने सर्वांनाच रोमांचित केले. 'व्हील्स ऑफ व्हॅलर : संचार शक्ती' या मोटारसायकल मोहिमेचा एक भाग म्हणून या पथकाने १० हजार फुटांपेक्षा जास्त उंचीवर असलेल्या जगातील सर्वात लांब महामार्ग बोगद्यात (अटल बोगदा) नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलाय. ही कामगिरी 'कारगिल विजय दिवसा'ला समर्पित असून, ती भारतीय सैन्याचे धैर्य, शिस्त आणि सांघिक कार्याचे एक उत्कृष्ट उदाहरण मानली जात आहे.

दोन मोटारसायकलींवर १० रायडर्सचा इतिहास : ३० जून रोजी पालचन (मनाली) येथे पोहोचलेल्या 'व्हील्स ऑफ व्हॅलर: संचार शक्ती' पथकाने १ जुलै रोजी आपल्या मोहिमेचा सर्वात महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला. 'डेअरडेव्हिल्स' पथकातील १० रायडर्सनी केवळ दोन मोटारसायकलींवर स्वार होऊन ९.८ किलोमीटर लांबीचा अटल बोगदा अवघ्या ९ मिनिटे ४७.९७ सेकंदात यशस्वीरित्या पार केला. समुद्रसपाटीपासून १०,०७५ फूट उंचीवर ही काम गिरी करणे अत्यंत आव्हानात्मक मानले जाते. या संपूर्ण कार्यक्रमादरम्यान पथकाने असाधारण संतुलन, समन्वय, संयम आणि उच्च दर्जाचे प्रशिक्षण यांचे प्रदर्शन केले.

कारगिल विजय दिवसाला समर्पित विशेष मोहीम : भारतीय सैन्याने 'कारगिल विजय दिवसा'च्या निमित्ताने जागतिक विक्रम प्रस्थापित करण्याचा हा प्रयत्न आयोजित केला होता. 'कॉर्प्स ऑफ सिग्नल्स'च्या 'डेअरडेव्हिल्स'द्वारे प्रस्तावित जागतिक विक्रम प्रयत्नांच्या मालिकेतील हा पहिला टप्पा आहे. हे साध्य करण्यासाठी पथकाने अनेक महिने कठोर प्रशिक्षण घेतले आणि तांत्रिक तयारीवर विशेष लक्ष दिले. सैन्याने स्पष्ट केले आहे की, ही मोहीम केवळ विक्रम प्रस्थापित करण्यापुरती मर्यादित नसून, ती जवानांचे धैर्य, समर्पण आणि राष्ट्रसेवेची भावना देखील दर्शवते.

सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन : जागतिक विक्रम करण्याच्या प्रयत्नादरम्यान सर्व सुरक्षा नियम आणि कार्यपद्धतींचे (प्रोटोकॉल) काटेकोरपणे पालन करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सुनिश्चित करण्यासाठी स्थानिक प्रशासन, हिमाचल प्रदेश पोलीस, सीमा रस्ते संघटना (ँध) आणि इतर संस्थांशी उत्कृष्ट समन्वय साधण्यात आला. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान 'डेअरडेव्हिल्स' पथक, कार्यक्रमाचे अधिकारी आणि सामान्य जनता यांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात आली. या कार्यक्रमातून भारतीय लष्कराची व्यावसायिक कार्यशैली आणि शिस्त पुन्हा एकदा दिसून आली.

## आरे कितीबी समोर येऊ द्या त्यांना एकटा बास...
## तुकाराम मुंढेंमुळे काय बदललं? थक्क करणारी आकडेवारी

**मुंबई/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मे महिन्यामध्ये पदभार स्वीकारल्यापासून या विभागाने कात टाकल्याचं पाहायला मिळत आहे. एकंदरितच या विभागाच्या कामामध्येही मोठा फरक पडल्याचं दिसत आहे. मुंढे आल्यापासून झालेल्या परिवर्तनचा अंदाज यावरुनच येईल की या विभागामार्फत होणाऱ्या अन्न नमुन्यांच्या तपासणीत तब्बल ४६२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आयुक्त मुंढे यांच्या निर्देशानंतर गुणवत्ता सुधारण्यासाठी पावलं उचलण्याच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली आहे.



या आणि मागच्या वर्षीची तुलना...

मुंढे आयुक्त म्हणून रुजू झाल्यापासून अन्न व औषध प्रशासनातर्फे संकलित करण्यात येणाऱ्या अन्न नमुन्यांच्या गुणवत्तेच्या तपासणीला वेग आला आहे. या वर्षी जून महिन्यामध्ये १३४७४ अन्न नमुने चाचणीसाठी प्रलंबित होते, त्यापैकी ७४९४ नमुन्यांची गुणवत्ता चाचणी करण्यात आली. त्यातील ४०९१ अन्न नमुने अप्रमाणित घोषित करण्यात आले. आता याच आकडेवारीची मागील वर्षाशी तुलना केली तर जून २०२५ मध्ये ९४०३ अन्न नमुन्यांपैकी १६२२ नमुन्यांची गुणवत्ता चाचणी करण्यात आली होती. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत यंदा या कालावधीत तपासणी केलेल्या नमुन्यांमध्ये तब्बल ४६२ टक्के वाढ झाली आहे. तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ही तपासणी वेगाने केली जात असल्याची माहिती समोर आली आहे.

१७ टक्क्यांवरुन ४६२ टक्के...

तपासणीमध्ये गती येण्यासाठी दोन शिफ्टमध्ये कामकाज, नमुन्याचे वर्गीकरण करून तपासणी करणे, उपलब्ध मनुष्यबळाचा प्रभावी वापर, बेंच पद्धतीने उपकरणांचा योग्य वापर अशा उपाययोजना केल्या आहेत. दूध व दुधजन्य पदार्थ, नाशिवंत अन्न पदार्थाचे नमुने व प्रतिबंधीत नमुन्यांची तपासणी प्राधान्याने केली जात आहे. प्रयोगशाळांमध्ये १ जून २०२६ रोजी १३४७४ अन्न नमुने तपासणीसाठी प्रलंबित होते. त्यापैकी ७४९४ नमुन्यांची तपासणी पूर्ण झाली. हे प्रमाण ५६ टक्के आहे. तपासणीदरम्यान ४०९१ अन्न नमुने अप्रमाणित घोषित करण्यात आले असून, त्यांची सरासरी ५४ टक्के आहे.

जून २०२५ मध्ये ९४०३ प्राप्त झालेल्या १६२२ नमुन्यांची तपासणी पूर्ण झाली होती, हे प्रमाण केवळ १७ टक्के होते. दोन्ही कालावधींची तुलना करता अन्न नमुन्यांच्या तपासणीच्या प्रम णात सुमारे ४६२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

तीन नव्या प्रयोगशाळा लवकरच

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडून संकलित करण्यात येणाऱ्या नमुन्यांची तपासणी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील प्रयोगशाळांमध्ये केली जाते. या माध्यमातून अन्नपदार्थाच्या गुणवत्तेची पडताळणी केली जाते. आणखी तीन नवीन प्रयोगशाळा सुरू करण्याचे काम प्रगतीपथावर असून, त्यांच्या इमारतींचे बांधकाम सुरू आहे. या प्रयोगशाळा कार्यान्वित झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या नमुन्यांचा अधिक जलद निपटारा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# केशवराज शैक्षणिक संकुलातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा

## विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या यशाला सलाम

**लातूर/प्रतिनिधी :** अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज शैक्षणिक संकुलात रविवार दि. ५ जुलै २०२६ रोजी,१० वी, १२ वी गुणवंत विद्यार्थी, छ्चचड परीक्षा, क्रीडा, कला क्षेत्र अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेचा नावलौकिक उंचावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा भव्य गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या कष्ट,जिद्द, चिकाटी आणि पालकांच्या त्यागाला मानाचा मुजरा करणारा हा सोहळा केवळ सत्काराचा कार्यक्रम नसून, नव्या पिढीच्या स्वप्नांना प्रेरणा देणारा आणि गुणवत्तेच्या परंपरेला नवी दिशा देणारा प्रेरणोत्सव ठरणार आहे.या भव्य कार्यक्रमाचे आयोजन तीन स्वतंत्र सत्रांत करण्यात आले असून प्रत्येक सत्रात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत गौरव करण्यात येणार आहे.

सकाळी शाळा परिसरात होणाऱ्या पहिल्या सत्रात छ्चचड शिष्यवृत्ती परीक्षा, तसेच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री केशवराज शैक्षणिक संकुल स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून उद्धव फड यांची उपस्थिती लाभणार आहे.

यानंतर सकाळी ११.०० वाजता दयानंद सभागृह, लातूर येथे दुसरे सत्र संपन्न होईल. या सत्रात इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ सभासद डॉ.राम पाटील (अंबाजोगाई) राहतील. प्रमुख मार्गदर्शक म्हणून लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जितेश चापसी तसेच लातूर जिल्हा परिषदेतील गटनेते रामचंद्र तिरुके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

सायंकाळी ५.०० वाजता दयानंद सभागृहात होणाऱ्या तिसऱ्या आणि मुख्य सत्रात दहावी बोर्ड परीक्षेत ९५ ते १०० टक्के गुण प्राप्त विद्यार्थी, बारावी बोर्ड परीक्षा, उएढ परीक्षा तसेच राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख राहतील. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच संभाजीनगरचे प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे,लातूर जिल्ह्याच्या अप्पर जिल्हाधिकारी तथा केशवराज विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी श्रीमती शिल्पाताई करमरकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव आणि केंद्रीय विद्यासभेचे संयोजक महेश कस्तुरे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने गेल्या अनेक दशकांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार, शिस्त आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाची समृद्ध परंपरा जपली आहे. या परंपरेतून घडलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करीत असून, त्यांच्याच गौरवासाठी आयोजित करण्यात आलेला हा सोहळा विद्यार्थ्यांच्या यशाला समाजाचा सन्मान देणारा आणि भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

या त्रिसत्रीय गुणगौरव सोहळ्यास लातूर शहर व जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी नागरिक, पालक, माजी विद्यार्थी व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद सामायिक करावा आणि भारतीय शिक्षण प्रसारक संस्था तसेच श्री केशवराज शैक्षणिक संकुलावरील आपला स्नेह अधिक दृढ करावा, असे आवाहन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख,जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष (माध्यमिक विभाग) गंगाधर खेडकर, शालेय समिती अध्यक्ष (रेनिसन्स सीबीएसई स्कूल) प्रा.श्रीकृष्ण जाधव, शालेय समिती अध्यक्षा (केशव शिशु वाटिका) सौ.वर्षाताई डोईफोडे,मुख्याध्यापक (माध्यमिक) शैलेंद्र कंगळे, उपमुख्याध्यापक तथा विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे,प्राचार्या (रेनिसन्स सीबीएसई स्कूल) श्रीमती सोनाली दर्डा, मुख्याध्यापक (प्राथमिक) शिवाजी हेंडगे,शिशु वाटिका प्रधानाचार्या सौ.अवंती कुलकर्णी, समन्वयक गुरूनाथ झुंजारे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.